शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 2 - शब्दसंपत्ती

भारांश – 24%   प्रश्नसंख्या – 6   एकूण गुण 12

2.4 आलंकारिक शब्द

आपली भाषा अधिक परिणामकारक व्हावी, तिचे सौंदर्य खुलून दिसावे दिसावे, आशयाची खोली वाढावी यासाठी आपण अनेक अर्थपूर्ण, आशयघन शब्द वापरतो ते आलंकारिक शब्द होत. यामुळे भाषेची गोडी वाढते.

➢ हे लक्षात ठेवा

आलंकारिक शब्दात दडलेला आशय काहीवेळा सकारात्मक तर काहीवेळा विरोधाभास असतो. म्हणून त्या शब्दांचा शब्दशः अर्थ घेऊ नये.

- उदा. गोगलगाय – निरुपद्रवी व्यक्ती, स्वभावाने अतिशय गरीब.

  जांबुवंत – म्हातारा व अनुभवी नेता.

  नवकोट नारायण – अपार धनसंपत्ती असणारा.

  कुंभकर्ण – अतिशय झोपाळू व्यक्ती
- थंडा फराळ – खायला न मिळाल्याने घडलेला उपवास.

  दीड शहाणा – फाजील शहाणा, मूर्ख

प्र.1 'शीघ्रकोपी मनुष्य' या अर्थाचा आलंकारिक शब्द निवडा.

1) धर्मराज   2) नरसिंह   3) दुर्वास   4) भस्मासूर

उत्तर – पर्याय – 3

स्पष्टीकरण- धर्मराज – न्यायप्रिय व्यक्ती, नरसिंह – उग्र व पराक्रमी माणूस, भस्मासूर – विनाश करणारा तर दुर्वास म्हणजे शीघ्रकोपी मनुष्य

प्र. 2 खालील वाक्यातील अधोरेखित भागासाठी योग्य आलंकारिक शब्द निवडा.

आमच्या गावात <u>अत्यंत भोळा माणूस</u> म्हणून पोपटरावांची ओळख होती.

1) सांबाचा अवतार 2) रामशास्त्री 3) हरीश्चंद्र 4) शिकंदर

उत्तर – पर्याय – 1

स्पष्टीकरण- सांबाचा अवतार – भोळा माणूस, रामशास्त्री – स्पष्टवक्ता न्यायाधीश, हरिश्चंद्र – सत्यवचनी माणूस, शिकंदर- भाग्यवान

2.5 शब्दसमूहाबद्दल एक शब्द

शब्दसमूहाबद्दल एक शब्द म्हणजे असा एखादा शब्द की ज्यामधून अनेक शब्दांनी व्यक्त होणारा आशय सांगितला जातो. यामुळे भाषेची गोडी वाढते.

उदा. आई आपल्या <u>लहान मुलाला झोपविण्यासाठी गाणे</u> गाते.

आई अंगाई गाते.

माझा हा सन्मान <u>कधीही विसर पडणार नाही असा</u> होता.

माझा हा सन्मान अविस्मरणीय होता.

प्र. 1 खाली दिलेल्या पर्यायातील शब्दसमूहाची चुकीची जोडी निवडा.

1) पायापासून डोक्यापर्यंत – आपादमस्तक

2) ईश्वर आहे असे मानणारा – आस्तिक

3) आधी जन्मलेला – अनुज

4) खोडसाळपणे पसरवलेली खोटी बातमी – अफवा

उत्तर – पर्याय – 3

स्पष्टीकरण- आधी जन्मलेला – अग्रज

प्र.2 मधुराचे डोळे हरिणासारखे आहेत म्हणून तिला सर्व मैत्रिणी .... म्हणतात.

1) मीनाक्षी 2) सुनयना 3) सुनेत्रा 4) मृगाक्षी

उत्तर – पर्याय – 4

2) स्पष्टीकरण- हरिणासारखे डोळे असणारी म्हणजे मृगाक्षी (मृग म्हणजे हरीण, अक्ष म्हणजे डोळा)

2.6 वाक्प्रचार

वाक्यात काही वेळा आलेला शब्दसमूह शब्दश: अर्थाने आलेला नसतो.तर भिन्न व विशिष्ट्य अर्थाने रूढ होऊन वापरला जातो. त्या शब्दासमूहाला वाक्प्रचार असे म्हटले जाते. वाक्प्रचारात कमी शब्दात जास्त अर्थ सामावलेला असतो. तुम्ही पाठ्यपुस्तकात अभ्यासलेल्या सर्व वाक्प्रचारांचा संग्रह करा.

उदा. आडवे येणे – कार्यात अडथळा आणणे.

स्वराज्याच्या पवित्र कार्यात आडवे येणाऱ्यांना शिवरायांनी अजिबात दयामाया दाखवली नाही.

ऊत येणे – अतिरेक होणे.

मुख्य रस्त्यावर वाहनांना अगदी ऊत आला आहे.

औषधावाचून खोकला जाणे- आपोआप संकट टळणे.

भांडखोर शेजाऱ्याची बदली झाल्याने गौरवला औषधावाचून खोकला गेला असेच वाटले.

प्र. 1 वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांची चुकीची जोडी निवडा.

1) कानावर घालणे – कळविणे 2) कानोसा घेणे – अंदाज घेणे

3)कानाडोळा करणे – हळूच पाहणे 3) कानावर पडणे – सहज ऐकू येणे

उत्तर – पर्याय – 3

स्पष्टीकरण – 'कानाडोळा करणे' याचा अर्थ 'दुर्लक्ष करणे' असा होतो.

प्र. 2 खालील आकृतीमध्ये लपलेल्या वाक्प्रचाराचा अर्थ पर्यायातून निवडा.

1) लाज वाटणे

2) दुसऱ्याला दोष देणे

3) इलाज नसणे

4) रागावणे

उत्तर – पर्याय – 1

स्पष्टीकरण – 'खापर फोडणे' हा वाक्प्रचार तयार होत असून त्याचा अर्थ 'दुसऱ्याला दोष देणे' असा होतो.

प्र.3 'डोळ्यात धूळ फेकणे' या वाक्प्रचाराच्या अर्थाचा वाक्प्रचार पर्यायातून निवडा.

1) डोळ्यात तेल घालणे 2) हातावर तुरी देणे

3)डोक्यात राख घालणे 4) डोळ्यात खुपणे

उत्तर – पर्याय – 2

स्पष्टीकरण- डोळ्यात तेल घालणे – काळजीपूर्वक काम करणे, डोक्यात राख घालणे – संतापणे, डोळ्यात खुपणे – मत्सर वाटणे तर डोळ्यात धूळ फेकणे व हातावर तुरी देणे या दोहोंचाही अर्थ फसवणे असा होतो.

विद्यार्थी अभिप्राय –

278 गुण – ग्रामीण विभागात राज्यात तृतीय क्रमांक

(पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा 2024)

नमस्ते, मी ऋत्विज. माझ्या या यशामध्ये मराठीमध्ये मिळालेल्या 46 गुणांचा मोठा वाटा आहे. इ. 8वी मध्ये सुरुवातीला व्याकरणाचे काही घटक खूप अवघड वाटायचे. ते घटक वर्गशिक्षिका सौ.जयश्री पलांडे मॅडम आणि शिष्यवृत्ती तज्ज्ञ मुख्याध्यापक श्री. गोडसे सर यांनी समजावून दिले. सततच्या सरावाने ते घटक पुढे सोपे वाटू लागले. उतारा, कवितावाचन, संवाद आणि शब्दसंपत्तीवरील विविध प्रश्नांच्या आकलनासाठी अवांतर वाचन व मराठी पाठ्यपुस्तकाच्या सूक्ष्मवाचनाचा खूप उपयोग झाला. नियमीत वाचन, विविध प्रश्नप्रकारांचा सराव, दिलेल्या माहितीचे शांत चित्ताने कमीत कमी वेळात अचूक विश्लेषण केल्यास मराठीमध्ये आपण नक्कीच उत्तम गुण संपादन करू शकतो.

-ऋत्विज विशाल सावंत

जिल्हा परिषद प्राथ. शाळा वाबळेवाडी, ता. शिरूर जि. पुणे

सरावासाठी प्रश्न

प्र. 1 पुढीलपैकी चुकीचा अर्थ असलेली अलंकारिक शब्दाची जोडी ओळखा. (2018)

1) झारीतला शुक्राचार्य - पडद्यामागचा सूत्रधार
2) वाघिणीचे दूध – अंगात शौर्य उत्पन्न करणारी गोष्ट
3) बजबजपुरी – गोंधळाची स्थिती
4) नगदनारायण - अत्यंत श्रीमंत व्यक्ती

प्र.2 अलंकारिक शब्द व त्याचा अर्थ यानुसार चुकीच्या जोड्या असणारे पर्याय कोणते? (दोन अचूक पर्याय निवडा) (2017)

1) सुंदोपसुंदी – दोघा भावांतील भांडण

2) पिंपळावरचा मुंजा – कायम भटका माणूस

3) चंद्रमौळी घर – अतिशय श्रीमंत

4) वज्राघात – मोठे युद्ध

प्र. 3 पुढील शब्दसमूहाबद्दलचा योग्य शब्द पर्यायांतून निवडा. (2019)

हे किंवा ते असे अनिश्चित-

1) वैकल्पिक 2) व्यवहारशून्य 3) संक्रमण 4) वैधानिक

प्र. 4 वाक्प्रचाराच्या अर्थानुसार योग्य जोडी निवडा. (2017)

1) उखळ पांढरे होणे – पुष्कळ द्रव्य मिळणे

2) खसखस पिकणे – खूप आनंद होणे
3) अत्तराचे दिवे लावणे – सुगंध पसरवणे
4) अन्नास मोताद होणे – भूक शमवणे

प्र. 5 वाक्प्रचार व त्याचा अर्थ अचूक जोड्या ओळखा. (2019)

1) गुण दाखवणे – खरे रूप दाखवणे
2) कंठशोष करणे – मोठ्याने रडणे
3) काट्याचा नायटा होणे – विचारांचा गोंधळ होणे
4) कंठ फुटणे – खणखणीतपणे बोलू लागणे

प्र. 6 पुढील वाक्यपूर्तीसाठी योग्य वाक्प्रचार निवडा.(2018)

माझ्या परदेशी मित्रांकडून आणि नातेवाइकांकडून त्या देशातील लहानमोठ्या नाण्यांची दुनियाही माझ्या ....

1) दप्तरी दखल होणे 2) इतिहास रचणे

3)मुठीत येणे 4) कवेत येणे

प्र. 7 आमच्या खेडेगावातील अत्यंत पराक्रमी पण उग्र मनुष्य म्हणून गोपाळरावांची ओळख होती. या वाक्यातील अधोरेखित भागाबद्दल येणारा अलंकारिक शब्द निवडा. (2020)

1) नरसिंह 2) बिरबल 3) नाना फडणवीस 4) रामशास्त्री

प्र. 8 ‘शब्दसमूहाबद्दल एक शब्द’ दिलेला आहे. त्यापैकी चुकीची जोडी निवडा. (2020)

1) जगाच्या विनाशाची वेळ – प्रलय
2) उजाडण्यापूर्वीचा समय – रामप्रहर
3) बोलावणे नसताना आलेला – आमंत्रित
4) हळूहळू होत जाणारा बदल – उत्क्रांती

प्र. 9 चुकीच्या अर्थाचे वाक्प्रचार कोणते ? दोन पर्याय निवडा. (2020)

1) ग्राह्य धरणे – स्वीकारणे   2) सोटेशाही करणे – गोंधळ घालणे

3)परिसीमा गाठणे – मागे राहणे   4) दप्तरी दाखल होणे – हजर होणे

प्र. 10 पुढील वाक्य पूर्ण करण्यासाठी योग्य वाक्प्रचाराची निवड करा. (2021)

प्रत्येकाचे आईवडील आपल्या मुलांच्या भविष्याचे ....

1) आडाखे बांधणे   2) खुणगाठ बांधणे

3) चंग बांधणे   4) विडा उचलणे

11) पुढीलपैकी चुकीचा अर्थ असलेला आलंकारिक शब्दाचा पर्याय निवडा.

(दोन पर्याय निवडा) (2024)

1) अरण्यरुदन – ज्याचा उपयोग नाही असे कृत्य
2) अळवावरचे पाणी – अल्पकाळ न टिकणारे
3) पांढरा कावळा – निसर्गात नसलेली वस्तू
4) परसातील भाजी – खूप प्रयत्नाने मिळवलेली वस्तू

उत्तरे

1. 1
2. 3 व 4
3. 1
4. 1
5. 1
6. 1
7. 1
8. 3
9. 2 व 3
10. 1
11. 2 व 4

सौ. जयश्री सुनिल पलांडे